आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

२६ नोव्हेंबर २०२४ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- भारतीय संविधानाच्या अमृतमहोत्सवा निमित्त राज्यभरात विविध कार्यक्रम
- संविधानाच्या माध्यमातून देशानं सामाजिक न्याय आणि सर्वसमावेशक विकासाचं ध्येय साध्य केलं, असं राष्ट्रपतींचं प्रतिपादन
- महाराष्ट्रात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा राजीनामा राज्यपालांना सुपूर्द / नवीन सरकारस्थापनेपर्यंत काळजीवाहू मुख्यमंत्री म्हणून पाहणार कामकाज
- प्रसिद्ध उद्योजक शशिकांत रुईया यांचं निधन

**आणि**

- ज्येष्ठ शाहीर मधुकर नेराळे कालवश

<><><><><>

भारतीय संविधान दिन आज देशभरात सर्वत्र साजरा होत आहे. ७५ वर्षांपूर्वी आजच्याच दिवशी भारत सरकारनं राज्यघटनेचा स्वीकार केला होता. त्यानिमित्त आजपासून वर्षभर विविध कार्यक्रमाचं आयोजन केलं जाणार आहे. संविधानाच्या मसुदा समितीचे अध्यक्ष डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या योगदानाचा गौरव करण्यासाठी २६ नोव्हेंबर हा दिवस संविधान दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय २०१५ ला सरकारने घेतला. देशात सर्वत्र संविधान दिनानिमित्त पदयात्रा काढण्यात येत आहेत तसंच संविधानाच्या उद्देशिकेचं जाहीर वाचन करण्यात येत आहे. आकाशवाणी मुंबईच्या आवारात आज संविधान दिनानिमित्त उद्देशिकेचं वाचन करण्यात आलं.

**<><><><><>**

संविधानाच्या माध्यमातून देशानं सामाजिक न्याय आणि सर्वसमावेशक विकासाचं ध्येय साध्य केलं, असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं. संविधान दिनानिमित्त नवी दिल्लीत संविधान सदनाच्या सेंट्रल हॉलमध्ये आयोजित भव्य कार्यक्रमाला त्या संबोधित करत होत्या. आपलं संविधान प्रजासत्ताक व्यवस्थेचा पाया असून नागरिकांचा वैयक्तिक आणि सामाजिक स्वाभिमान सुनिश्चित करण्याचं काम याद्वारे होतं, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानात प्रगतीशील आणि सर्वसमावेशक विचारांची पेरणी केली, असं त्या म्हणाल्या.

**उपराष्ट्रपती** जगदिप धनखड यांनीही या कार्यक्रमाला संबोधित केलं. गेल्या ७५ वर्षात देशानं आर्थिक, सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती केली आहे. देशाला आंतरराष्ट्रीय पातळीवर ओळख मिळाली आहे, त्यामुळे देशात संविधानाची अंमलबजावणी किती प्रभावीपणे केली गेली हे दिसून येतं असं उपराष्ट्रपती म्हणाले. संविधानाच्या प्रस्तावनेद्वारे प्रत्येक नागरिकाला स्वातंत्र्य, समता आणि न्याय यांची हमी दिली जाते, असंही ते म्हणाले.

संविधान सभेत विविध विचारधारांचे लोक होते, मात्र त्यांनी एकत्र येत संविधानाची निर्मिती केली. हीच परंपरा आपण सभागृहात पुढे न्यायला हवी, असं लोकसभेचे सभापती **ओम बिर्ला** यांनी सांगितलं. स्वातंत्र्यानंतर संसदेच्या माध्यमातून देशात आर्थिक, सामाजिक परिवर्तन घडलं, लोकशाहीच्या तिन्ही स्तंभांनी देशाच्या समग्र विकासात भर टाकली असंही बिर्ला म्हणाले.

कार्यक्रमाच्या **सुरुवातीला** देशानं संविधान स्वीकारून ७५ वर्षं झाल्यानिमित्त राष्ट्रपतींच्या हस्ते ७५ रुपयांच्या स्मारक नाण्याचं, तसंच टपाल तिकिटाचं अनावरण करण्यात आलं. संविधानाच्या निर्मितीचा इतिहास आणि

प्रक्रिया उलगडून दाखवणाऱ्या दोन पुस्तकांचं अनावरणही यावेळी झालं. तसंच संविधानाच्या संस्कृत आणि मैथिली भाषेतल्या प्रतीही यावेळी प्रकाशित करण्यात आल्या. त्याआधी संविधान निर्मितीची माहिती देणारी चित्रफित **उपस्थितांना** दाखवण्यात आली. या कार्यक्रमाला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू, लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी, राज्यसभेचे विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे उपस्थित होते.

**<><><><><>**

भारत एक चैतन्यशील लोकशाही आणि राजकीय नेतृत्व म्हणून उदयाला येत असून देशाच्या परिवर्तनाला संविधानानं हाताभार लावला आहे, असं प्रतिपादन सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती संजीव खन्ना यांनी केलं. संविधान दिनानिमित्त सर्वोच्च न्यायालयात बार असोसिएशननं आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. स्वातंत्र्यानंतर संविधानानं देशाच्या प्रगतीत दिलेल्या योगदानाचाही खन्ना यांनी यावेळी पुनरूच्चार केला.

**<><><><><>**

राज्यभरात आज संविधान दिन उत्साहानं साजरा होत आहे. संविधान दिनानिमित्त **मुंबई**त मंत्रालयात झालेल्या कार्यक्रमात काळजीवाहू उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी संविधानाच्या प्रास्ताविकेचं वाचन केलं. यावेळी मुख्य सचिव सुजाता सौनिक तसंच इतर मान्यवर उपस्थित होते.

**सिंधुदुर्ग** जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकाऱ्यांनी संविधानाच्या उद्देशिकेचं वाचन करून त्याचं महत्त्व सांगितलं. **नागपूर**मध्ये युवा ग्रॅज्युएट फोरम आणि संविधान फाऊंडेशननं वॉक फॉर संविधान रॅलीचं आयोजन केलं होतं. या रॅलीच्या माध्यमातून संविधानाबद्दल जाणीव जागृती तसंच संविधानातल्या तरतुदी

आणि हक्क याबद्दल माहिती देण्यात आली. **वाशीम** इथं डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात संविधान उद्देशिकेचं वाचन करण्यात आलं.

**धाराशिव** इथं मतदार जनजागृती समितीच्या वतीनं संविधान जनजागृती रॅली काढण्यात आली. **छत्रपती संभाजीनगर** इथंही क्रांती चौकातून भारतीय संविधान, सन्मान, सुरक्षा, संवर्धन समितीतर्फे रॅली काढण्यात आली. **धुळे** जिल्हाधिकारी कार्यालयात आज सकाळी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात झालं.

**अकोला** जिल्हा परिषदेच्या अधिकारी कर्मचाऱ्यांनी जिल्हा परिषदेच्या प्रांगणात संविधान दिन उत्साहात साजरा केला. उपस्थित अधिकारी कर्मचाऱ्यांनी संविधानाच्या उद्देश पत्रिकेचे वाचन करत शपथ घेतली.

**<><><><><>**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज पदाचा राजीनामा दिला. १४ व्या विधानसभेचा कार्यकाळ आज संपत असल्यानं शिंदे यांनी राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांच्याकडे मुख्यमंत्री पदाचा राजीनामा सुपूर्द केला. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह मंत्री दादा भुसे, मंत्री दीपक केसरकर उपस्थित होते. नवीन सरकार स्थापन होईपर्यंत काळजीवाहू मुख्यमंत्री म्हणून काम पहावं, असं राज्यपालांनी एकनाथ शिंदे यांना सांगितलं. आता नवनिर्वाचित आमदारांची १५ वी विधानसभा गठित करण्याची आणि नव्या सरकारच्या स्थापनेची प्रक्रिया सुरू होईल. त्यामुळे आता नवीन सरकार अस्तित्वात येईपर्यंत एकनाथ शिंदे हे काळजीवाहू मुख्यमंत्री म्हणून काम पाहतील. नवीन सरकारस्थापनेबाबत अद्याप निर्णय झालेला नाही.

**<><><><><>**

सव्वीस अकराच्या मुंबई दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या पोलीस अधिकारी आणि जवानांचा आज सोळावा स्मृतीदिन. मुंबई पोलिस मुख्यालयात, राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसंच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांनी या हल्ल्यातल्या हुतात्म्यांना पुष्पचक्र वाहून आदरांजली व्यक्त केली. हुतात्म्यांचे कुटुंबीय आणि उपस्थित आजी - माजी पोलिस अधिकाऱ्यांची भेट राज्यपालांनी यावेळी घेतली.

<><><><>

राज्याच्या पोलीस महासंचालक पदी रश्मी शुक्ला यांची पुनर्नियुक्ती झाली आहे. निवडणूक आयोगाच्या निर्देशांनुसार शुक्ला यांच्या जागी संजयकुमार वर्मा यांची नेमणूक झाली होती. आणि शुक्ला यांना सक्तीच्या रजेवर पाठवण्यात आलं होतं. शुक्ला यांना पदावरुन हटवण्याची मागणी काँग्रेसनं केली होती. आता निवडणूक प्रक्रीया संपल्यानंतर शुक्ला यांना पुन्हा नियुक्त करण्याचा आदेश गृहमंत्रालयानं काल काढला आहे.

<><><><>

ज्येष्ठ अभिनेते मोहन जोशी यांना यंदाचा रंगकर्मी जीवनगौरव पुरस्कार काल उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. मराठी नाट्य कलाकार संघाच्या वतीने काल मुंबईत यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात जागतिक रंगकर्मी दिवसाचं आयोजन केलं होतं, यात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

<><><><>

प्रसिद्ध उद्योजक आणि एस्सार उद्योगसमूहाचे सह संस्थापक शशिकांत रुइया यांचं काल मध्यरात्रीच्या सुमारास मुंबईत निधन झालं. ते ८१ वर्षांचे होते. दीर्घ आजारावर अमेरिकेत उपचार घेऊन ते महिनाभरापूर्वीच मुंबईत परतले होते.

शशिकांत रुईया यांच्या निधनाबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी तीव्र दुःख व्यक्त केलं आहे.

<><><><><>

संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यातले ज्येष्ठ शाहीर आणि लोककलेचे अभ्यासक मधुकर नेराळे यांचं काल मुंबईत लालबाग इथल्या राहत्या घरी निधन झालं. ते ८१ वर्षांचे होते. त्यांच्या पार्थिवावर भोईवाडा स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

शाहीर नेराळे यांनी अखिल भारतीय मराठी शाहीर परिषदेची स्थापना केली. या माध्यमातून शाहिरांचे अनेक प्रश्न सोडवले. महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे आयोजित सातारा, सांगली, लातूर, नाशिक, जुन्नर इथल्या तमाशा शिबिरांचे संचालक म्हणून त्यांनी काम पाहिलं. त्यांना महाराष्ट्र शासनाच्या 'तमाशा सम्राज्ञी विठाबाई नारायणगावकर' पुरस्कारानं गौरवण्यात आलं होतं.

//<><><><><>//